नॅक पुनर्मुल्यांकन दर्जा "अ+"

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक क्र. आस्था / आर.ओ. / २२ / २०२५

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, मा. कुलगुरु महोदयांच्या असे निदर्शनास आले की, बहुतांश अधिकारी / कर्मचारी विनापरवानगी रजेवर जात आहेत, तसेच आपल्या रजा कालावधीत आपल्या कडील कार्यभार इतर अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे सोपविण्यात येत नाही. त्यामुळे नियमित प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरिता अडचण निर्माण होत आहे.

करिता, मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, यापुढे कोणीही विनापरवानगी रजा घेवू नये. आपल्या सर्व प्रकारच्या रजा या फक्त विद्यापीठाच्या ट्रॅक सिस्टिम मधील लीव्ह मॅनेजमेन्ट प्रणाली व्दारेच सादर करण्यात याव्यात, तसेच रजेची प्रत विभाग प्रमुखांमार्फत आस्थापना विभागात सादर करणे अनिवार्य आहे. यापुढे साध्या अर्जाव्दारे सादर करण्यात आलेल्या रजा गृहित धरण्यात येणार नसून सदरचा रजा कालावधीहा विनावेतन करण्यात येणार आहे, याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

तसेच, अधिकारी आणि कर्मचारी यांनी पुर्व परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये. विद्यापीठ आस्थापनेवरील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी रजेवर जातांना आपल्याकडील पदभार / कार्यभार आपल्या वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार इतर अधिकारी / कर्मचारी यांचेकडे सुपुर्द करणे अनिवार्य आहे.

सर्व शैक्षणिक आणि प्रशासकीय विभाग प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे.

विद्यापीठ परिसर, )(
छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४ )(
संदर्भ क्र. :- आस्था/आर.ओ./२२/२०२५ )(
दिनांक :- ०८-०८-२०२५ )(

कुलसचिव

***********

**या परिपत्रकाची प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव;**

०१) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख

०२) संचालक, युनिर्व्हसिटी नेटवर्क ॲण्ड माहिती केंद्र (युनिक)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.